DAY — **07** SEAT NUMBER | | | | | | |

| 2025 | VII | 02 | 1100 | **J-379** | **(M)** |
|---|---|---|---|---|---|

# HISTORY (38)

**Time : 3 Hrs.** **(11 Pages)** **Max. Marks : 80**

***सूचना :*** *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

*(२) उजव्या बाजूस गुण दर्शविलेले आहेत.*

*(३) उत्तरपत्रिकेमध्ये आकृत्या पेननेच काढाव्यात.*

*(४) नवीन प्रश्नाचे उत्तर नवीन पानांवर सुरू करावे.*

**प्र. १.** **(अ)** दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून पूर्ण विधाने पुन्हा लिहा : (६) **[ १० ]**

(१) जेरूसलेम आणि ———ही दोन शहरे ज्यू, ख्रिश्चन आणि इस्लाम या धर्मांच्या अनुयायांसाठी अत्यंत पवित्र आहेत.

(अ) बेथेलहॅम

(ब) क्यूबेक

(क) मेंझ

(ड) इस्तंबूल (कॉन्स्टॅन्टिनोपल)

(२) भारतीय राजांना हिंदी महासागरात जहाजे पाठवायची असतील तर ——— ———चे परवाने (कार्ताझ) घेणे आवश्यक होते.

(अ) डच

(ब) ब्रिटिश

(क) पोर्तुगीज

(ड) फ्रेंच

(३) इ.स. १६६८ मध्ये राजापूर येथे ——— यांच्या परवानगीने फ्रेंचांनी वखार सुरू केली.

(अ) छत्रपती शाहू महाराज

(ब) छत्रपती संभाजी महाराज

(क) छत्रपती राजाराम महाराज

(ड) छत्रपती शिवाजी महाराज

(४) सत्यशोधक समाजाची स्थापना ——— यांनी केली.

(अ) राजा राममोहन रॉय

(ब) महात्मा जोतीराव फुले

(क) स्वामी दयानंद सरस्वती

(ड) स्वामी विवेकानंद

(५) राष्ट्रसंघ ही संकल्पना ———ने मांडली.

(अ) फ्रान्स

(ब) अमेरिका

(क) इटली

(ड) जर्मनी

(६) सिएटो संघटनेचे मुख्यालय ———येथे होते.

(अ) थायलंड

(ब) फिलिपाईन्स

(क) पाकिस्तान

(ड) ग्रेट ब्रिटन

**(ब)** पुढील प्रत्येक संचामधील 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा : (४)

(१)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | कुंवरसिंह | — | लखनौ |
| (ii) | नानासाहेब पेशवे | — | कानपूर |
| (iii) | राणी लक्ष्मीबाई | — | झाशी |
| (iv) | चिमासाहेब | — | कोल्हापूर |

(२)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | हैदराबाद संस्थानाचे विलीनीकरण | — | स्वामी रामानंद तीर्थ |
| (ii) | काश्मीर संस्थानच्या विलीनीकरणासाठी सामीलनाम्यावर सही | — | शेख अब्दुल्ला |
| (iii) | गोवा मुक्तिलढ्यातील मोलाचे योगदान | — | मोहन रानडे |
| (iv) | पुदुच्चेरी येथील कामगार नेते | — | व्ही. सुबय्या |

(३)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| (i) | बांडुंग | — | बांडुंग परिषद |
| (ii) | पॅरिस | — | १९१९ मधील 'अखिल आफ्रिका ऐक्य परिषद' |
| (iii) | लंडन | — | १९०० मधील पहिली 'अखिल आफ्रिका ऐक्य परिषद' |
| (iv) | मँचेस्टर | — | आशियाई ऐक्य परिषद |

(४) ‘अ’ गट — ‘ब’ गट

(i) ‘दो बूंद जिंदगी के’ — स्वच्छ भारत अभियान

(ii) ‘सारे शिकू या, पुढे जाऊ या’ — सर्व शिक्षा अभियान

(iii) ‘या आणि खेळा’ — क्रीडा क्षेत्राच्या विकासाची योजना

(iv) ‘अतुल्य भारत’ — पर्यटनास उभारी देण्याची मोहीम

**प्र. २.** **( अ )** ऐतिहासिक ठिकाण, व्यक्ती, घटना या संबंधीची नावे लिहा : (४) **[८]**

(१) बाष्पशक्तीवर चालणारी क्लेरमाँट ही बोट तयार करणारा इंजिनियर –

(२) ब्रिटिशांनी चेन्नईच्या उत्तरेला बांधलेला किल्ला –

(३) पोर्तुगीजांचा दारूगोळा असलेले ठिकाण –

(४) वायकोम सत्याग्रहात भाग घेणारे –

**( ब )** दिलेल्या कारणांपैकी योग्य कारण निवडून विधाने पूर्ण करा : (४)

(१) रविंद्रनाथ टागोर यांनी ‘सर’ या पदवीचा त्याग केला, कारण –

(अ) जालियनवाला बाग हत्याकांडाच्या निषेध करण्यासाठी.

(ब) सायमन कमिशनला विरोध करण्यासाठी.

(क) भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा देण्यासाठी.

(ड) असहकार आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी.

(२) पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली, कारण –

(अ) युरोपमध्ये आयात–निर्यात धोरणविषयक जकात निश्चिती करण्यासाठी.

(ब) राष्ट्रा–राष्ट्रातील कलह व वाद सामोपचाराने मिटवले जावेत, जगात शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी.

(क) पराभूत राष्ट्रांचे आर्थिक शोषण करण्यासाठी.

(ड) अमेरिकेला जगाचे नेतृत्व करावयाचे होते यासाठी.

(३) दुसऱ्या महायुद्धकाळात आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळ अधिक तीव्र झाली, कारण –

(अ) आफ्रिकेतील वसाहतींनी परकीयांचे वर्चस्व झुगारून टाकले.

(ब) आफ्रिकेत पाश्चात्त्य शिक्षणपद्धती होती.

(क) दुसऱ्या महायुद्धकाळात इंग्रज व फ्रेंचानी वसाहतींना काही अधिकार द्यायला सुरुवात केली.

(ड) पाश्चात्त्य देश दुसऱ्या महायुद्धात गुंतले होते.

(४) ॲन्झुस (ANZUS) करारात ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड आणि युनायटेड स्टेटस ऑफ अमेरिका वगळता कोणत्याही राष्ट्राला प्रवेश दिला नाही, कारण –

(अ) त्यांना ग्रेट ब्रिटन व फ्रांसचे महत्त्व वाढू द्यायचे नव्हते.

(ब) हा लष्करी करार होता.

(क) हा गुप्त करार होता.

(ड) हा फक्त मित्रदेशांतील करार होता.

**प्र. ३.** **( अ )** पुढील नकाशाचे निरीक्षण करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा : (५) **[१३]**




(१) प्रस्तुत नकाशात किती वसाहती दर्शविल्या आहेत?

(२) अमेरिकेतील मॅसॅच्युसेटमधील कोणत्या बंदरात चहाच्या पेट्या समुद्रात फेकण्याची घटना घडली?


(३) अमेरिका खंडाच्या पूर्वेस कोणता समुद्र आहे?

(४) विल्यमबर्ग हे शहर कोणत्या वसाहतीत स्थित आहे?


(५) नकाशात सर्वात दक्षिणेला कोणती वसाहत आहे?

**(ब)** दिलेली संकल्पना चित्रे पूर्ण करा (कोणतेही <u>चार</u>) : (८)


(१) संकल्पना चित्र पूर्ण करा:





(२) युरोपीय सत्ता व त्यांची भारतातील महत्त्वाची वसाहती लिहून संकल्पना चित्र पूर्ण करा:





(३) संकल्पना चित्र पूर्ण करा:



(४) संकल्पना चित्र पूर्ण करा:




(५) संकल्पना चित्र पूर्ण करा:




(६) तक्ता पूर्ण करा :

| पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्ती | संस्था |
|---|---|
| (१) राहीबाई पोपेरे | ----------- |
| (२) भाऊ काटदरे | ----------- |
| (३) प्रेमसागर मेस्त्री | ----------- |
| (४) हमीद दलवाई | ----------- |

प्र. ४. **( अ )** संक्षिप्त टिपा लिहा (कोणत्याही तीन) : (६) **[१५]**

(१) राजर्षी शाहू महाराज

(२) 'कामागाटा मारू'

(३) निर्वसाहतीकरण

(४) स्पीड पोस्ट

(५) आयुष

**( ब )** पुढील विधाने सकारण स्पष्ट करा (कोणतीही तीन) : (९)

(१) औद्योगिक क्रांतीची सुरुवात सर्वप्रथम इंग्लडमध्ये झाली.

(२) छत्रपती शिवाजी महाराजांनी बारदेशावर स्वारी केली.

(३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांवर समाज उभारणी केली.

(४) हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले.

(५) ब्रिटिश आणि म्यानमार यांच्यात तीन युद्धे झाली.

प्र. ५. **तुमचे मत नोंदवा ( कोणतेही तीन ) :** **[९]**

(१) 'अमेरिकन स्वातंत्र्याचा जाहिरनामा' प्रसिद्ध झाला.

(२) भारतीय स्वातंत्र्यलढ्यामध्ये क्रांतीसिंह नाना पाटील यांचे योगदान महत्त्वाचे आहे.

(३) अमेरिका व रशिया यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले.

(४) भारत अवकाश संशोधन क्षेत्रातील अग्रणी देश आहे.

(५) पर्यटन स्थळांची काळजी सर्वांनी घ्यावी.

**प्र. ६. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा ( कोणतेही <u>दोन</u> ) :** **[१०]**

(१) पोर्तुगीज-मराठा संघर्षाविषयी माहिती लिहा.

(२) गोवा मुक्ति लढ्याविषयी माहिती लिहा.

(३) दुसऱ्या महायुद्धाची कारणे लिहा.

**प्र. ७. खालील प्रश्नांची दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तरे लिहा ( कोणतेही <u>तीन</u> ) :** **[१५]**

(१) भौगोलिक शोध व शोधकांची माहिती लिहा :

(अ) ख्रिस्तोफर कोलंबस

(ब) अमेरिगो वेस्पुसी

(क) वास्को-द-गामा

(२) ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विषयी माहिती लिहा :

(अ) स्थापना

(ब) ईस्ट इंडिया कंपनीला मिळालेले अधिकार

(क) वखारीचे प्रशासन

(३) १९४२ च्या 'चलेजाव' आंदोलनाची माहिती लिहा :

(अ) मुंबई अधिवेशन

(ब) महात्मा गांधीजींचे आवाहन

(क) आंदोलनाचे परिणाम

(४) राज्यांच्या पुनर्रचनेविषयी माहिती लिहा :

(अ) झारखंड

(ब) तेलंगण

(क) उत्तराखंड

(५) सार्क (दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार संघटना) विषयी माहिती लिहा :

(अ) स्थापना व ध्येये

(ब) सार्क समोरील आव्हाने

(क) सार्कचे यश

◆◆◆